

“स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद”- कर्मवीर



रयत शिक्षण संस्थेचे,

# श्री रावसाहेब रामराव पाटील महविद्यालय, सावळज.

ता. तासगाव जि. सांगली

**मराठी, हिंदी व इंग्रजी विभागाच्या वतीने वाङ्मय मंडळ अंतर्गत विशेष व्याख्यान**

## ‘साहित्य निर्मिती प्रक्रिया’

**सोमवार दि. २२/१२/२०२५** **वेळ – स. १०.०० वा.**

## ! कार्यक्रम पत्रिका !

- प्रास्ताविक : प्रा. डॉ. एस. व्ही. पणदे
  **IQAC समन्वयक व इंग्रजी विभाग प्रमुख**
- पाहुण्यांचा परिचय : प्रा. डॉ. एस. टी. कदम
  **प्रमुख, हिंदी विभाग**
- प्रतिमा पूजन : मान्यवरांच्या हस्ते
- प्रमुख पाहुणे : **प्रो. (डॉ.) मोहन लोंढे**
  **प्रसिद्ध मराठी साहित्यिक**
- अध्यक्ष : प्र. प्राचार्य प्रो. (डॉ.) बी. एस. चव्हाण
  **श्री रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज**
- आभार : प्रा. एस. पी. सवने
  **सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग**
- सूत्रसंचलन : प्रा. डॉ. एम. एन. तारळेकर
  **सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग**

**स्थळ : २१ नंबर हॉल**

Scanned with OKEN Scanner



“स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद”- कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,



# श्री रावसाहेब रामराव पाटील महविद्यालय, सावळज.

ता. तासगाव जि. सांगली

## वाङ्मय मंडळ अंतर्गत विशेष व्याख्यान

# ‘साहित्य निर्मिती प्रक्रिया’

**सोमवार दि. २२ /१२ /२०२५**

**वेळ – स. १०.०० वा.**



❖ प्रमुख पाहुणे :- प्रो. (डॉ.) मोहन लोंढे

प्रसिद्ध मराठी साहित्यिक

❖ अध्यक्ष :- प्र.प्राचार्य प्रो. (डॉ.) बी. एस. चव्हाण



श्री रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज

Scanned with OKEN Scanner

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
December 25, 2025
Page no 2 | epaper.mahanewsnet.com

# साहित्य हे समाज परिवर्तन घडवत असते : डॉ.मोहन लोंढे

* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

**कोरेगांव, दि. २४ डिसेंबर :** विद्यार्थ्यांनी भाषिक कौशल्य विकसित करणे महत्त्वाचे आहे कारण काहीतरी वाचल्याशिवाय अनुभवल्याशिवाय ऐकल्याशिवाय लिहिण्याची कला विकसित होत नाही. मनामध्ये व विचारांमध्ये निर्माण झालेले कल्पनेचे विविध तरंग या तरंगातूनच साहित्याच्या बिजाला अंकुर फुटत असते व नवनिर्मित साहित्य निर्माण होत असते असे साहित्य एखाद्या नवोदित लेखकाची आंतरिक निर्मिती असली तरी ती समाजसापेक्ष असते म्हणून साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे मानले जाते किंवा समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते असेही म्हटले जाते कारण समाज वगळता साहित्य निर्माण होऊ शकत नाही म्हणून साहित्य हे समाज परिवर्तन घडवत असते समाजाला दिशा देण्याचे काम साहित्य करत असते असे दर्जेदार साहित्य विद्यार्थ्यांच्या हातून घडावे नवीन लेखकाची पिढी निर्माण व्हावी असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक डॉ. मोहन लोंढे यांनी केले. रयत शिक्षण संस्थेचे रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय सावळज येथे मराठी, हिंदी, इंग्रजी विभागाद्वारे वाङ्मय मंडळ अंतर्गत साहित्य निर्मिती प्रक्रिया या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानामध्ये ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते पुढे ते म्हणाले की, साहित्यिक हा कोणत्या विद्यापीठांमध्ये घडत नसतो तो आंतरिक स्वप्रेरणेने स्वतःच्या कल्पनाशक्ती व प्रतिभा शक्तीच्या बळावर घडत असतो म्हणून साहित्यिकाच्या विचाराला समाजात एक किंमत असते म्हणून विद्यार्थ्यांनी भाषिक कौशल्य विकसित करून लिखाणाची उर्मी सदैव बाळगला हवी असे मत त्यांनी व्यक्त केले.



अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.वी.एस.चव्हाण साहेब उपस्थित होते ते आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील लेखन घडावे यासाठी वाङ्मय मंडळा अंतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते त्यामध्ये भीतीपत्रक, निबंध, वक्तृत्व, कथाकथन, काव्यवाचन स्पर्धा तसेच आग्रणी नियतकालिकसाठी अंक याचा समावेश होतो यातून विद्यार्थ्यांचा लिहिता हात अखंड लिहीत राहावा हा उदेश ठेवून विद्यार्थ्यांकडून नवनिर्मित लेखन घडत असते यातून विद्यार्थ्यांमध्ये सृजनशील लेखनाचा विकास होतो असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक, दिग्दर्शक, कथा व पटकथाकार चंद्रकांत मिरेकर तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. बी. राठोड, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. एस. जे. लगड, ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. बी. डी. राजगे तसेच विविध विभागाचे विभाग प्रमुख व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.एस.व्ही.पणदे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा व उपस्थित मान्यवरांचा परिचय हिंदी विभाग प्रमुख डॉ. एस. टी. कदम यांनी करून दिला, आभार मराठी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक एस. पी. सवने यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. एम. एन. ताळेकर यांनी केले.



Scanned with OKEN Scanner